महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट/100/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 /

दिनांक : 12/03/2025

# "नांदेड पोलीस दलातर्फे मिशन सहयोग अंतर्गत ऑपरेशन बीट कनेक्ट उपक्रमाची सुरूवात"

पोलीस प्रशासन आणि समाज यांचा एक घनिष्ट संबध असतो. पोलीसांच्या कामकाज पध्दतीचा परिणाम समाजावर पडत असतो पोलीस प्रशासन 24X7 समाजासाठी कार्यरत असतात. अशा वेळी दैनंदिन कामकाजाशिवाय सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून विधायक कार्य करण्याकरीता **मा. श्री. अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे संकल्पना व मार्गदर्शनाखाली "**मिशन सहयोग**" ची सुरूवात करण्यात आली. "**मिशन सहयोग**" अंतर्गत खालील 08 नाविन्यपूर्ण 1. ऑपरेशन बीट कनेक्ट, 2. मिशन उडान, 3. ऑपरेशन वारसा जतन, 4. नांदेड पोलीस लीग (NPL), 5. मिशन महिला सुरक्षा, 6. मिशन समाधान, 7. मिशन निर्धार, 8. मिशन एकता उपक्रमां पैकी **ऑपरेशन बीट कनेक्ट** अंतर्गत जिल्हयातील प्रत्येक गावाची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल यांचे मध्ये संवाद वाढण्यासाठी पोलीस दल, पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल यांच्या मध्ये काल दिनांक 11.03.2025 रोजी सकाळी 08.30 वाजता पोलीस मुख्यालय, कवायत मैदान येथे क्रिकेट व व्हॉलीबॉल, तसेच महिला पोलीस पाटील यांचे करीता संगीत खुर्ची सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हयातील 34 पोलीस पाटील यांना उत्कृष्ट कामगिरी करीता सत्कार करून सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल यांचेकरीता पोलीस पाटील मेळावा व नविन कायदे विषयक मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेत **श्रीमती दलजीत कौर जज,** लिगलएड प्रमुख, नांदेड यांनी नविन कायदे विषयक तरतुदीची माहिती आणि पोलीस पाटील यांचे कर्तव्य याबाबत मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमास **मा. श्री. अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री. खंडेराय धरणे,** अपर पोलीस अधीक्षक भोकर, **मा. श्री. सुरज गुरव,** अपर पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **श्रीमती डॉ अश्विनी जगताप मॅडम,** पोलीस उप अधीक्षक (मु) नांदेड, **मा. श्री. किरण पोपळघट,** परि. पोलीस उप अधीक्षक, नांदेड **उदय खंडेराय**, पोलीस निरीक्षक, स्थागुशा, **विजय धोंडगे**, राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस अधिकारी अंमलदार व नांदेड जिल्हयातील 500 ते 600 पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल सदस्य हजर होते.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड